# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों. क्र. १०१५/१९/अ.क्र. ५८६/२२/०१

**श्री. मुन्नावर बाबु सय्यद**
शाहिद शेख/खिदमत फाऊंडेशन
रुम नं. ४१, १ /२, खलिद बुक कॉर्नर समोर,
हिंगगल्लीजवळ, बेहरामनगर, वांद्रे (पूर्व)
मुंबई – ४०००५१.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
नॅशनल गर्ल्स हायस्कूल, अनंत कालेकर मार्ग,
बेहरामनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
आय.वाय. कॉलेज कंपाऊंड, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई – ४०००६०.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०२.०५.२०२२/२७.०५.२०२२</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |

उक्त प्रकरणी दिनांक ०२.०५.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१) अन्वये दि. ११.१०.२०१८ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जान्वये त्यांनी, We are require the details of the secondary section for std. V to X of National Girls High School, Urdu Medium, located at A.K. Marg, Bandra East, Mumbai ४०००५१ all documents submitted for approval from the education department बाबतची सविस्तर माहिती/छायांकित कागदपत्रांची मागणी केलेली होती.

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. १८.०२.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.११.२०१८ रोजी असे उत्तर देण्यात आले की, आपण केलेला माहिती अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये, कलम ३(अ) नुसार फक्त १५० शब्दांचा असावा. आपण एका वेळी फक्त एकाच विषयाची माहिती मागणी करु शकता. तसेच आपण मागितलेली माहिती हि जनहिताशी संबंधित नसेल तर ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये, कलम ८ (i) (j) नुसार आपणांस देता येत नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.१२.२०१८ च्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना वैयक्तिक माहिती सोडून इतर सर्व माहिती विनामूल्य देण्यात यावी असे आदेश देऊन अपिल निकाली काढले.

आजच्या सुनावणीस अपिलकर्ता यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक श्रीमती मोमीन उस्मान गहानी ( Momin Aleema Usman Ghani) यांनी दिनांक ०२.०५.२०२२ रोजी आयोगात पत्र पाठविण्यात आले की, त्यांना दिनांक १०.०५.२०२२ रोजीनंतर सुनावणीची पुढील तारीख हवी आहे.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक १७.०५.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

आजच्या पुनर्सुनावणीस अपिलकर्ता यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक श्री. संदिप पाटील यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपिलकर्ता यांना अपेक्षित असलेली व उपलब्ध असलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-५(४) व ५(५) प्रमाणे इतरसंबंधित अधिका-यांशी समन्वय साधून प्राप्त करुन १५ दिवसात स्पीड पोस्टाने नि:शुल्क देण्यात यावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १७.०५.२०२२**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

AARTI